# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 December 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०७ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- ईशान्य भारतातली आठ राज्यं म्हणजे अष्टलक्ष्मीची प्रतीकं असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेला आज हरियाणातल्या पंचकुला इथून प्रारंभ
- विधानसभेचं आजपासून विशेष अधिवेशन–कालिदास कोळंबकर यांची हंगामी अध्यक्षपदी नियुक्ती
- नदीजोड प्रकल्प आणि हरित ऊर्जेवर भर देणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही
- माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचं निधन–अहिल्यानगर जिल्ह्यात राजूर इथं आज अंत्यसंस्कार

आणि

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी देशभरातून अभिवादन

****

ईशान्य भारतातली आठ राज्यं म्हणजे अष्टलक्ष्मीची प्रतीकं असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. काल नवी दिल्लीत अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. आपल्या भाषणात पंतप्रधान म्हणाले...

***‘‘मां लक्ष्मी को सूख, आरोग्य और समृद्धी की देवी कहा जाता है। जब भी लक्ष्मी जी की पूजा होती है, तो हम उनके आठ रूपों को पुजते है। इसी तरह भारत के पूर्वोत्तर में आठ राज्यों की अष्टलक्ष्मी विराजमान है। आज का भारत***

*दुनिया को हेल्दी लाईफस्टाईल से जुडे हुये, न्युट्रीशन से जुडे हुये जो सोल्युशन देना चाहता है, उसमें नॉर्थ ईस्ट की बडी भूमिका है।''*

तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ईशान्येकडील आठही राज्यांची संस्कृती, वस्त्रोद्योग, हस्तकला, पर्यटन स्थळं आणि अद्वितीय उत्पादनं दाखवण्यात येणार आहेत.

****

देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेला आजपासून प्रारंभ होत आहे. हरयाणातल्या पंचकुला इथे, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या उपस्थितीत सुरू होणारी ही मोहीम, ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ३४७ जिल्ह्यांमधून पुढचे शंभर दिवस राबवली जाणार आहे. या क्षयाचे नवीन रुग्ण शोधणं, गंभीर रुग्णांसाठी आधुनिक उपचार करणं, तसंच पोषक आहाराचा पुरवठा करणं, यावर मोहीमेत भर दिला जाईल.

नांदेड जिल्ह्यात या मोहीमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वांनी सक्रीय सहभाग घ्यावा आणि २०२५ मध्ये जिल्हा क्षयमुक्त होईल यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी काल राज्य विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदाची शपथ घेतली. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी राजभवनात कोळंबकर यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. विधानसभेचं तीन दिवसीय विशेष अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. २८८ नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांना विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर पदाची शपथ देतील.

दरम्यान राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या १६ से २१ डिसेंबर या कालावधीत नागपूर इथं होणार आहे.

****

मुख्यमंत्रिपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात नदी जोड प्रकल्प आणि हरित ऊर्जेवर आपला भर राहणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत बोलत होते. या निर्णयामुळे शेती आणि उद्योग क्षेत्राला लाभ होऊन, राज्याच्या

अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला, ते म्हणाले…

***"मागच्या काळामध्ये एरिगेशन मिनिस्टर म्हणून, चार नदी जोड प्रकल्पांना मान्यता दिली आहे, हे प्रकल्प महाराष्ट्राला कायम दुष्काळातून मुक्त करू शकतात, कायम! ग्रीन एनर्जीवर माझा भर राहणार आहे, कारण आपण मागच्या काळामध्ये ५४ हजार मेगावॅटचे वेगवेगळे प्रोजेक्ट्स हातामध्ये घेतले आहेत. आणि या प्रोजेक्टमुळे २०३० साली, महाराष्ट्रातली ५२ टक्के वीज ही अपारंपरिक स्रोतातली म्हणजे ग्रीन एनर्जी असणार आहे. सगळ्यात जास्त शेतीचं क्षेत्र आणि उद्योगाचं क्षेत्र या दोन्ही क्षेत्रांना प्रचंड फायदा या दोन इनिशिएटीव्हचा असणार आहे. महाराष्ट्रामध्ये रोजगाराची निर्मिती देखील होईल, आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला विशेष चालना यामुळे मिळेल.''***

दरम्यान, मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्यावर फडणवीस काल छत्रपती संभाजीनगर इथं खासगी कार्यक्रमासाठी आले होते. विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी तसंच मनपा आयुक्त जी. श्रीकांत, यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचं काल नाशिक इथं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे गेल्या १५ ऑक्टोबरपासून त्यांच्यावर नाशिकच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. राज्य मंत्रिमंडळात विविध पदं भुषवलेले पिचड यांनी, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानंतर पाच वर्षांपूर्वी भाजपामध्ये प्रवेश केला होता. आज सायंकाळी अहिल्यानगर जिल्ह्यात राजूर इथं पिचड यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

पिचड यांच्या निधनामुळे आदिवासी समाजासाठी अहोरात्र झटणारा आणि कर्मसिद्धांताचा उपासक आपण गमावला, अशी शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

****

१९७१ साली भारतानं पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाची आठवण म्हणून, 'विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉन'ला राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी काल मुंबईतून हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. या मॅरेथॉनमध्ये सहभागी सैन्य दलातील धावपटू,

येत्या १६ डिसेंबरपर्यंत मुंबई, नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर आणि पुणे असं ४०५ किलोमीटरचं अंतर पार करणार आहेत. यावेळी राज्यपालांनी कुलाबा इथल्या हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली.

****

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त काल देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात आलं. मुंबईत दादरच्या चैत्यभूमीवर राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी इथं बाबासाहेबांना अभिवादन केलं.

चैत्यभूमीसह नागपुरात दीक्षाभूमीवरही बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्रसिद्ध लेखक शाहू पाटोळे यांचं व्याख्यान झालं. जल, जमीन आणि जातीय ऐक्य हे विषय बाबासाहेबांच्या जगण्यातील श्वास आणि ध्यासही होते, असं मत पाटोळे यांनी व्यक्त केलं.

दरम्यान, विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच काल मोठी गर्दी झाली होती. शहरात विविध उपक्रमातून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. फेस ऑफ आंबेडकर राईट मूव्हमेंट अर्थात फॅम या सामाजिक संस्थेच्या वतीने ‘एक वही एक पेन’ हे अभियान राबवण्यात आलं. मिलिंद नागसेन वन स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशन तसंच रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांच्यावतीनं रक्तदान शिबिर घेण्यात आलं.

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**

जालना शहरातल्या मस्तगड इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी विविध पक्ष संघटनांचे सदस्य तसंच नागरिकांनी सकाळपासूनच गर्दी केली.

**

परभणी इथं जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भिक्खू संघाच्या वतीने पंचशील ध्वजारोहण करून महावंदना घेण्यात आली.

**

हिंगोली जिल्ह्यात विविध ठिकाणी सभा आणि इतर कार्यक्रमातून बाबासाहेबांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

**

धाराशिव इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सामाजिक समरसता मंचाच्या वतीने बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं, तसंच यानिमित्ताने रक्तदान शिबिर घेण्यात आलं.

विभागात बीड, लातूर, नांदेडसह राज्यात बुलडाणा, वाशिम, धुळे इथंही बाबासाहेबांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आदरांजली वाहण्यात आली.

****

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर–गावसकर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं पहिल्या डावात १८० धावा केल्या आहेत. काल सकाळी भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, यजमान संघाच्या गोलंदाजीपुढे भारतीय फलंदाज खेळपट्टीवर टिकाव धरू शकले नाहीत, सलामीवीर यशस्वी जयस्वाल शून्यावर बाद झाला, रोहित शर्मा तीन तर विराट कोहली सात धावांवर तंबूत परतले. काल खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलिया संघानं पहिल्या डावात एका गड्याच्या मोबदल्यात ८६ धावा केल्या होत्या.

****

लातूर इथं दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धांचं काल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते उद्घाटन झालं. जिल्ह्यातील ५१ शाळांमधील जवळपास ६०० दिव्यांग विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. दिव्यांगत्व प्रकार आणि वयोगटानुसार ९२ विविध गटात या स्पर्धा होणार असल्याचं, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी सांगितलं. उद्घाटनापूर्वी विद्यार्थ्यांनी पथसंचलन केलं, त्यानंतर क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली.

दरम्यान, लातूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचं काल जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांच्या हस्ते उद्धाटन झालं. या महोत्सवात विविध कलाप्रकारात अनेक युवक सहभागी झाले आहेत.

****

बीड युवा महोत्सवाचा काल समारोप झाला. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या उपस्थितीत झालेल्या समारोप समारंभात, विविध स्पर्धांमधल्या विजयी स्पर्धकांना पारितोषिकं प्रदान करण्यात आली. युवकांना अशा महोत्सवातून प्रोत्साहन मिळतं, यातूनच देशाचे भविष्य घडण्यासही मदत होते, असं मत स्वामी यांनी व्यक्त केलं.

****

चंपाषष्ठीचा सोहळा आज साजरा होत आहे. पुणे जिल्ह्यातल्या जेजुरीसह, छत्रपती संभाजीनगर शहरानजीकच्या सातारा आणि धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथल्या खंडोबा मंदिरात आजपासून विविध धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. खंडोबाच्या षड्रारोत्सवाचंही आज उत्थापन होत आहे.

****